जलसंपदा विभागाच्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत निविदा प्रसिध्दी, निविदा लिफाफे उघडणे आणि निविदा तपासणी व स्वीकृती याबाबत एकत्रित सुधारित सूचना...

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/मोप्र-१

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २२ मे, २०१८

वाचा : १) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय, क्रमांक सीएटी २०१७/प्र.क्र. ८/इमा-२, दिनांक १२ एप्रिल २०१७

२) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन शुध्दीपत्रक, क्रमांक सीएटी २०१७/प्र.क्र. ०८/इमा-२, दिनांक २९ जून२०१७.

३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली परिच्छेद २०२, परिशिष्ट ४२

४) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. विअसु २०१५/प्र.क्र. २१८/इमारती-२, दिनांक १६/१२/२०१५

५) जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र. निविदा ०४११/(३१९/२०११)/मोप्र-१, दिनांक १८/१०/२०१४ व शुध्दीपत्रक दिनांक १०/५/२०१६

६) सार्वजनिक बांधकाम विभाग, इंग्रजी शासन निर्णय क्र. Sankirn-२०१७/C.R.१२१/Part-II/Bldg-२,दिनांक २३/१०/२०१७.

७) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. निविदा २०१७/प्र. क्र.२७४/मोप्र-२, दिनांक २७/०६/२०१७ व शुध्दीपत्रक निविदा १०१७/प्र. क्र.५०७/१७/मोप्र-१, दिनांक ०५/१२/२०१७

प्रस्तावना :-

शासनाने दिनांक १९ ऑक्टोबर २०१४ च्या शासन निर्णयाव्दारे ई-निविदा प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक केले आहे. तसेच रुपये ३ लक्ष किंमतीच्या वरील सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने मागवून स्वीकृत करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. Digital India मोहितेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे जास्तीतजास्त कामकाज ई-गर्व्हनन्स पध्दतीने व्हावे व निविदा प्रक्रिया ही ई-निविदा प्रक्रियेने असावी, असे धोरण निश्चित करण्यात आले आहे. ई-निविदा प्रणालीच्या माध्यमातून येणा-या निविदा, प्रसिध्द होणा-या सूचनांस वैश्विक प्रसिध्दी प्राप्त होत असल्यामुळे सर्वसाधारणत: शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता नसल्याचा होणारा आरोप खंडित होत असल्याने तसेच ई-निविदा प्रणालीमध्ये आवश्यक बाबी हया संगणकीय Encrypted Digital Key आज्ञावलीमध्ये बंदीस्त होत असल्याने त्या गुप्त रहाण्याची व सर्वदूर स्पर्धा होण्याची निश्चित शाश्वती होत असल्याने ई-निविदा प्रणालीच्या वापरामुळे मोठया प्रमाणात शासकीय कामकाजात पारदर्शकता येऊन निरनिराळया ठिकाणाहून दबाव येणे किंवा हस्तक्षेप करुन कंत्राटदारांना निविदा भरण्यास अडथळे वगैरे सर्व प्रकार थांबण्यास मदत झालेली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांच्या संदर्भ क्रमांक १ व २ च्या शासन निर्णयान्वये निविदा विषयक एकत्रित सुधारित सूचना निर्गमित केल्या आहेत. या सर्व सूचना निरनिराळया शासन निर्णयाव्दारे यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्या असल्या तरी देखील शासनाकडे प्राप्त होणा-या निविदेमधील छाननी व तद्नुषंगाने प्रधान सचिव तसेच अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये निविदांच्या तपासणीमध्ये एकात्मिक धोरणाचे प्रतिबिंब न आढळल्याने या संपूर्ण प्रक्रियेचा एकात्मिक विचार करुन जुन्या सूचना अधिक्रमित करुन निविदा विषयक कामकाजासाठी नव्याने सूचना निर्गमित करणे क्रमप्राप्त ठरले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने संदर्भ क्रमांक १ व २ निर्गमित केलेले निर्णय हे प्रामुख्याने त्यांच्या अखत्यारितील कामांचा विचार करुन करण्यात आलेले आहेत. सदर सूचना निर्गमित करताना जलसंपदा विभागाचे अभिप्राय घेण्यात आले नव्हते. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या कामांचे स्वरुप व व्याप्ती पाहता निविदा प्रक्रीयेतील बाबींवर एकत्रित सूचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते. या अनुषंगाने सर्व बाबींचा सर्वंकष अभ्यास करुन खालील बाबींवर एकत्रित सूचना या शासन निर्णयाव्दारे प्रसृत करण्यात येत आहे :-

अ) ई- निविदा प्रसिध्दी
ब) निविदा प्रसिध्दी कालावधी व कार्यपध्दत
क) ई- निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही
ड) ई- निविदा उघडताना निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही
इ) ई- निविदा स्वीकृती

शासन निर्णय :-

जलसंपदा विभागाची विविध कामे शीघ्रतेने व पारदर्शकतापूर्ण व्हावीत यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. तथापि, याबाबत यापूर्वी उपरोक्त ५ मुद्यांबाबत निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

अ)ई-निविदा प्रसिध्दी-

सध्याच्या पध्दतीमध्ये बहुतांश कामे ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन प्राप्त निविदेतील निम्नतम देकाराच्या कंत्राटदारांची ई-निविदा स्वीकृत करुन कार्यारंभ आदेश ई- निविदेतील विहित मुदतीत कामे करण्याच्या अटीसह देण्यात येतात. या सर्व कामांच्या निविदा मागविण्यासाठी यापूर्वी शासन निर्णय क्रमांक सीएसटी/१०८७/प्र.क्र. ४२/इमा-२, दिनांक ५ सप्टेंबर १९८८ रोजी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच निविदा प्रसिध्दीबाबत सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतुदींप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. आता या संदर्भात पूर्वीच्या सर्व सूचना अधिक्रमित करुन नव्याने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

१. रुपये ३ लक्ष पर्यंतच्या कामांसाठी वृत्तपत्रातून जाहिरात देऊन खरेदी करण्याची अथवा निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. अशा अतिशय छोटया कामांसाठी कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्या नोटीस बोर्डवर निविदा सूचना मराठी व इंग्रजी भाषेतून प्रसिध्द करण्यात यावी. प्रथम

सूचनेसाठी आठ दिवस व त्यास प्रतिसाद न मिळाल्यास व्दितीय सूचनेसाठी पाच दिवस एवढा कालावधी ठेवण्यात यावा. तसेच विभागाच्या संकेतस्थळावर सूचना प्रसिध्द करावी.

रुपये ३ लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामांसाठी सामान्य प्रशासन विभागाच्या विहित मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ज्या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करावयाच्या आहेत, त्यांचा स्तर खालील तक्त्याप्रमाणे असावा-

अ.क्र.	कामाची किंमत	प्रसिध्दीचा स्तर			
		जिल्हा स्तर	राज्य स्तर	राष्ट्रीय स्तर	आंतरराष्ट्रीय स्तर
१.	रु. ३ लक्ष ते रु. ५० लक्ष	मराठी (१ वृत्तपत्र)	मराठी (१ वृत्तपत्र) इंग्रजी (१ वृत्तपत्र)	--	--
२.	रु. ५० लक्ष ते २५ कोटी	मराठी (१ वृत्तपत्र)	मराठी (२ वृत्तपत्रे) हिंदी (१ वृत्तपत्र)	इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (१ वृत्तपत्र)	--
३.	रु. २५ कोटी ते १०० कोटी	मराठी (२ वृत्तपत्रे)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (१ वृत्तपत्र)	इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे)	--
४.	रु. १०० कोटी आणि त्यावरील	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे)	मराठी (२ वृत्तपत्रे) इंग्रजी (२ वृत्तपत्रे) हिंदी (२ वृत्तपत्रे)

२. ज्या जिल्हयातील काम आहे, त्या जिल्हयातील wide circulation (सर्वात जास्त प्रमाणात प्रसिध्द होणारी) असणा-या महत्वाच्या वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करणे महासंचालक (प्रसिध्दी) यांना अनिवार्य राहिल. वृत्तपत्रात द्यावयाची जाहिरात ही **प्रपत्र-१** मध्ये नमूद विहित नमुन्यात असावी. या कुठलाही बदल करण्यात येऊ नये. जाहिरातींची प्रसिध्दी तातडीने होणे आवश्यक असल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांनी उपसंचालक, (प्रसिध्दी/ संचालक/ महासंचालक), माहिती संचालनालय यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून तीन दिवसांचे आत निविदा प्रसिध्द होतील असे पहावे. प्रसिध्दी संचालनालयाकडून याबाबत काही हरकत घेतल्यास त्याचे तात्काळ निराकरण करण्यासाठी संबंधित मुख्य अभियंता/ कार्यकारी संचालक यांचेशी तात्काळ संपर्क साधून सूचना प्रसिध्दीबाबत हयगय होणार नाही याकडे कक्ष द्यावे. निविदा सूचना प्रसिध्दी

विभागाकडे पाठविल्यानंतर तीन दिवसांचे आत ई-निविदा प्रसिध्द झाली नाही तर त्याची कारणे अभिलेखावर ठेवण्यात यावीत. ज्या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द झाली आहे ते वृत्तपत्र संबंधित कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी निविदा धारिकेस जोडावे. निविदा प्रसिध्द झालेले संपूर्ण वृत्तपत्र (फक्त कात्रण नव्हे) निविदा धारिकेवर उपलब्ध झाले नाही तर निविदा स्वीकृत करणा-या सक्षम प्राधिका-यांनी ही बाब धारिकेवर ठेवावी व अशा निविदा पुरेशा प्रसिध्द न झालेल्या निविदा समजून अस्वीकृत करण्यात याव्यात.

३. ई- निविदा प्रसिध्दी यापुढे mahatenders.in या NIC विकसित webportal वर व शासनाने विशिष्ट आदेश दिल्यास योग्य त्या अन्य web portal वर प्रसिध्द कराव्यात. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कामांसाठी केंद्र शासनाच्या प्रसिध्दी निकषांचे अनुपालन करावे. Sify nexttenders.com हया web portal चा वापर समाप्त करण्यात आलेला आहे. त्यामुळे ई- निविदा सूचना mahatenders.in वरच प्रसिध्द करण्यात याव्यात.

ब) ई-निविदा प्रसिध्दी कालावधी व कार्यपध्दत:-

१. निविदा प्रसिध्दीचा किमान कालावधी व निविदा संच किंमत खालीलप्रमाणे असावी :-

अ.क्र.	निविदेची अंदाजित किंमत	निविदा संच किंमत	प्रथम वेळ	व्दितीय वेळ	तृतीय वेळ
१.	रु. ३ लक्ष ते रु. ५० लक्ष	रू.२०००/-	१५ दिवस*	१० दिवस*	७ दिवस*
२.	रु. ५० लक्ष ते रु. १०० कोटी	रु.५०००/-	२५ दिवस*	१५ दिवस*	१० दिवस*
३.	रु. १०० कोटी आणि त्यावरील	रु. १००००/-	७५ ते ९०दिवस*	४५दिवस*	४५दिवस*

(* निविदा विक्रीचा पहिला व शेवटचा दिवस तसेच निविदा सादर करावयाचा अंतिम दिवस हे शासकीय कामकाजाचे दिवस असावेत.)

२. निविदा प्रारुप व त्यातील सर्वसाधारण अटी -

२.१ जलसंपदा विभागाच्या कामांसाठी ब-१ नमुन्यातील निविदा पध्दतीची कार्यपध्दत सर्वसाधारणपणे योग्य असल्याने तसेच ई-निविदाव्दारे निविदांची कार्यवाही हाताळली जात असल्याने ब-१ प्रकारातील निविदाव्दारे कामांसाठी निविदा मागविण्यात याव्यात.

२.२ शासन स्तरावरुन प्रमाण निविदा कागदपत्रे (Standard Bid Documents) जारी केल्यानंतर त्यांचा वापर करावा, तोपर्यंत प्रचलित पध्दतीचा अवलंब करावा.

२.३ रुपये ५ कोटीपेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी निविदा स्वीकृत करणा-या अधिका-याच्या परवानगीने विशिष्ट स्वरुपाच्या कामासाठी “क” नमुन्यातील (Lump Sum) निविदा मसुद्याचा वापर करण्यास हरकत नाही.

३. प्रारुप निविदा कागदपत्रे (Draft Tender Papers) मंजुरीचे अधिकार :

प्रारुप निविदा मंजुरीचे अधिकार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत :-

कार्यकारी अभियंता	:	रु. १.०० कोटी पर्यंत
अधीक्षक अभियंता	:	रु. १.०० कोटी पेक्षा जास्त ते रु. २.५० कोटी पर्यंत
मुख्य अभियंता	:	रु. २.५० कोटी वरील किंमतीच्या निविदांसाठी

४. प्रारुप निविदा कागदपत्रांमध्ये सुधारणा करणे.

४.१ निविदा सूचना प्रसिध्द करण्यापूर्वी प्रारुप निविदा कागदपत्रे सक्षम अधिका-यांकडून मंजूर करावीत.

४.२ प्रसिध्द केलेल्या निविदेतील अथवा निविदा सूचनेतील कोणत्याही बाबीत बदल करण्यात येऊ नयेत, बदल करणे अत्यावश्यक असल्यास खालील तक्त्यात दर्शविलेल्या सक्षम अधिका-यांच्या पूर्वमंजूरीनेच करण्यात यावेत, याची दक्षता घ्यावी. तसेच, अशी मंजुरी प्रदान करतानाची कारणे website वर ठळकपणे प्रसिध्द करावीत.

अ.क्र.	निविदा स्वीकृती स्तर	प्रसिध्द केलेल्या निविदा सूचनेत बदल करण्यास मंजुरी प्रदान करणारे सक्षम अधिकारी
१.	कार्यकारी अभियंता स्तरावरील निविदा	संबंधित अधीक्षक अभियंता
२.	अधीक्षक अभियंता स्तरावरील निविदा	संबंधित मुख्य अभियंता
३.	मुख्य अभियंता व शासन स्तरावरील निविदा	मुख्य अभियंता

५. निविदा पुर्व बैठक

रुपये ३ कोटीपेक्षा जास्त रक्कमेच्या निविदांकरिता निविदापूर्व बैठकी ऐवजी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

अ.क्र.	मुद्दा	सुधारित कार्यपध्दती
१.	निविदेतील तरतुदी व अटी संबंधीतील कंत्राटदारांच्या हरकती	निविदा पूर्व बैठक न बोलविता कंत्राटदाराकडून निविदेतील तरतुदी व अटी संबंधीतील हरकती लेखी स्वरुपात ई-निविदा प्रणालीव्दारे निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांकाच्या ७ दिवस अगोदर घेणे आवश्यक राहील.
२.	सी.एस. डी. (Common Set of Deviations)	त्यानंतर २ दिवसांच्या आत सी.एस.डी. (Common Set of Deviations) निर्गमित करावेत. तसेच, सदर सी.एस.डी. (Common Set of Deviations) हा निविदेचा भाग राहील.

६. निविदा सादर करावयाची कार्यपध्दती-

६.१ ई-निविदा प्रणालीमध्ये संकेतस्थळावर सर्व निविदा कार्यकारी अभियंता स्तरावर अपलोड करण्यात येत असल्याने सर्व निविदा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात सादर करण्यात याव्यात.

६.२ निविदा विक्रीच्या कालावधीनंतर निविदा सादर करण्यासाठी रु. १ कोटी पर्यंतच्या निविदांसाठी १ दिवस, रु. १ कोटी ते रु.२.५० कोटी पर्यंतच्या निविदांसाठी २ दिवस तर रु.२.५० कोटीपेक्षा जास्त रक्कमेच्या निविदांसाठी ३ दिवस कालावधी देण्यात यावा.

६.३ कोणत्याही परिस्थितीत कंत्राटदारांकडून निविदा हार्ड कॉपीच्या स्वरुपात स्वीकारली जाणार नाही. या संदर्भातील अट निविदेत समाविष्ट करावी.

७. इसारा रक्कम (EMD) -

शासनाने विहीत केलेल्या प्रमाणानुसार ज्यावेळी कंत्राटदार कामांसाठी निविदा सादर करतो त्यावेळी प्रत्येक कामासाठी स्वतंत्रपणे इसा-याची रक्कम भरणे आवश्यक आहे. इसा-याची रक्कम भरण्यास सूट मिळण्यासाठी ठेकेदारांना काही रक्कम शासनाकडे ठेवल्यावर व आवश्यक बंधपत्र पूर्ण केल्यानंतर इसारा रक्कम भरण्यापासून सूट देण्याची तरतूद आता रद्द करण्यात येत आहे. या पुढे इसारा रक्कम online रोख स्वरुपात RTGS/NEFT व्दारे संबंधित कंत्राटदाराच्या बँक खात्यातून भरणे बंधनकारक राहील.

खालीलप्रमाणे इसा-याची रक्कम निविदेसोबत भरणे आवश्यक आहे.

अ.क्र.	निविदेची अंदाजपत्रकीय किंमत	इसारा रक्कम (अंदाजपत्रकीय किंमतीच्या)
१	रुपये १ कोटीपर्यंत	१ %
२	रुपये १ कोटीपेक्षा जास्त व रुपये ३ कोटीपर्यंत	०.७५ % परंतु कमीत कमी रुपये १ लक्ष
३	रुपये ३ कोटीपेक्षा जास्त	०.५० % परंतु कमीत कमी रुपये २.२५ लक्ष

८. सुरक्षा अनामत (Security Deposit)-

कंत्राटदाराकडून एकूण खालीलप्रमाणे सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात यावी.

अ.क्र.	निविदेची अंदाजपत्रकीय किंमत	सुरक्षा अनामत रक्कम (अंदाजपत्रकीय किंमतीच्या)
१	रुपये १ कोटीपर्यंत	५%
२	रुपये १ कोटीपेक्षा जास्त व रुपये ३ कोटीपर्यंत	४ % परंतु कमीत कमी रुपये ५लक्ष
३	रुपये ३ कोटीपेक्षा जास्त	३ % परंतु कमीत कमी रुपये १२ लक्ष

निविदेची किंमत जर अंदाजपत्रकीय किंमतीच्या १०% पेक्षा जादा किंमतीने वाढणार असेल तर सुरक्षा अनामत रक्कम वर नमुद केलेल्या प्रमाणात वाढविण्यात यावी. व त्याप्रमाणे प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.

९. कामांच्या निविदा निश्चित करताना पूर्व अर्हते ऐवजी पश्चात अर्हता पध्दतीचा अवलंब करण्याबाबत:-

जलसंपदा विभागाच्या कामाची व्याप्ती पाहता जलसंपदा विभागाचा शासन आदेश क्र. निविदा ०४११/(३१९/२०११)/मोप्र-१,दिनांक १८/१०/२०१४ व शुध्दीपत्रक दिनांक १०/५/२०१६ यामध्ये बदल करून खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत व प्रस्तुत निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

९.१ जलसंपदा विभागांतर्गत रु. ३ कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी कामाच्या करारनाम्यात पश्चात अर्हता कार्यपध्दतीची तरतूद करण्यात यावी. कामाच्या करारनाम्यात पुढीलप्रमाणे पश्चात अर्हता तरतूद समाविष्ट असावी.

अ.	कंत्राटदाराची मागील ५ वित्तीय वर्षातील वार्षिक सरासरी उलाढाल	:	संबंधित कामाच्या किंमतीच्या कमीत कमी ७५ टक्के (चालू दराने)
ब.	कंत्राटदाराने समतुल्य किंमतीचे किमान एक सदृष्य काम पूर्ण केलेले पाहिजे. अशा कामाची कमीत कमी किंमत --	:	संबंधित कामाच्या किंमतीनुसार (चालू दराने) **१.** रु. ३ कोटी ते रु. १० कोटी : ३०% **२.** रु. १० कोटी पेक्षा जास्त : ३० % किंवा रु. ५ कोटी यापैकी जास्त असणारी किंमत.
क.	संबंधित कामासाठी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत त्याचे कमीतकमी परिमाण	:	संबंधित कामातील महत्वाच्या बाबींच्या परिमाणाच्या ३०%.
ड.	कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity)	:	**(अे x एन x२)- बी** जेथे, **अे**- गेल्या पाच वर्षातील जास्तीत जास्त वार्षिक उलाढाल (चालू दराने) **एन**- कामाचा कालावधी (वर्षे) **बी**- हातातील कामांची किंमत(कामांच्या कालावधीतील))
इ.	संबंधित कामांच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम कंत्राटदारांनी कोणत्याही कालावधीत प्रत्यक्ष केलेले असणे अनिवार्य करण्यात यावे.		
फ.	संबंधित कामासाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असणे अपेक्षित असलेली स्वत:च्या मालकीची / भाडेतत्वावरील / Lease वरील यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थापनाबाबतची व्यवस्था याचे निकष मुख्य अभियंता यांनी प्रत्येक प्रकरणी तपासणी करुन निश्चित करावेत. सदर यंत्रसामुग्री बांधकामाचे वेळी कार्यक्षेत्रावर उपलब्ध करण्याबात कंत्राटदाराचे बंधपत्र/हमीपत्र घ्यावे.		

९.२ उलाढाल, कामाची किंमत इत्यादीची परिगणना चालू दराने करताना प्रतिवर्षी १० टक्के वाढ विचारात घेण्यात यावी.

९.३. उपरोक्त (क) नुसार बाबींची निवड करताना संबंधीत कामामधील महत्वाच्या व ठळक बाबी विचारात घ्याव्यात.

९.४ हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचूक व परिपूर्णरीत्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील. तसेच, देय कामासाठी निविदा सादर केल्यानुसार, परंतु त्यासंबधी अंतिम निर्णय

होण्यापूर्वी एखादे नवीन काम मिळाल्यास त्यासंबंधीची माहिती त्वरीत सादर करणे देखील कंत्राटदारावर बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार ते येथोचित कारवाईस पात्र राहतील.

९.५ उपरोक्त (इ) नुसार निकष निश्चित करताना समकक्ष कामाची व्याख्या नि:संदिग्ध असण्याबाबत दक्षता घ्यावी.

९.६ कामाच्या कराररनाम्यात पश्चात अर्हता निकष समाविष्ट आहेत, ही बाब निविदा सूचनेमध्ये स्पष्टपणे नमूद करावी.

९.७ प्रथम लिफाफा क्रमांक १ तांत्रिक क्षमता (Technical Bid) online उघडण्यात यावे. जे कंत्राटदार तांत्रिक अर्हतेबाबत पात्र ठरतील त्यांचा लिफाफा क्र. २ आर्थिक अर्हता (Financial Bids) online उघडण्यात यावा व त्यामधील सर्व कंत्राटदारांचे दर उपस्थित कंत्राटदारांसमोर वाचण्यात यावेत.

९.८ रु.३ कोटी व त्यावरील अंदाजित किंमतीच्या सर्व कामांसाठी पश्चात अर्हता पध्दत लागू राहील. रु.१.०० ते रु.३ कोटी अंदाजपत्रकीय किमंतीच्या कामांसाठी कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity) वरील मुद्दा क्र.९.१ अंतर्गत (ड) मधील सूत्रानुसार विहित केलेल्या पध्दतीने ठरविण्यात यावी. कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity) ठरविण्याचे अधिकार निविदा स्वीकृत करणा-या अधिका-यास असतील.

१०. निकोप स्पर्धा व्हावी व जास्तीत जास्त स्पर्धात्मक यासाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत

१०.१ रुपये १.५० कोटी पर्यंत रक्कमेच्या निविदांकरिता कंत्राटदार नोंदणीकृत (पंजीकृत) असण्याची अट अनिवार्य करण्यात यावी.

१०.२ रुपये १.५० कोटी पेक्षा जास्त रक्कमेच्या निविदांकरिता कंत्राटदार पंजीकृत असावेत (Registered with P.W.D.) ही अट वगळण्यात यावी.

१०.३ आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उपकंपनी भारतीय असल्यास निविदेत भाग घेण्याची अट निविदा सूचनेत समाविष्ट करावी. यास व्यापक स्तरावर प्रसिद्धी देऊन तसेच प्रत्येक निविदेमध्ये सर्व कंत्राटांसाठी पात्रता निकष निश्चित करण्यात येवून सर्व निकषांप्रमाणेच कंत्राटदारांना पात्र/अपात्र ठरविण्यात यावे. तसेच अपात्रतेची कारणे संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन अशा अपात्र कंत्राटदारांना त्यांचे म्हणणे माडण्यासाठी संधी ५ दिवसांच्या कालावधीसाठी देण्यात यावी व क्षुल्लक कारणांमुळे कंत्राटदार अपात्र होत असेल तर तत्संबंधी आवश्यक त्या निकषांची पूर्तता या निर्धारित कालावधीत त्यांनी केल्यास त्यांच्या पात्रतेविषयी सक्षम अधिका-यांनी घेवून सुधारित पात्र कंत्राटदारांची यादी संकेत स्थलावर प्रसिद्ध करावी व त्यांना निविदा स्पर्धेत भाग घेण्याची परवानगी द्यावी.

११. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिपत्रक क्र. Sankirn-२०१७/C.R.१२१(PART-II)/Building-२, दि.१९/९/२०१७ तसेच परिपत्रक क्र. Sankirn-२०१७/C.R.१२१(PART-II)/Building-२, दि.२३/१०/२०१७ मधील तरतुदीनुसार एक वर्षापेक्षा जास्त कालावधीच्या कामांसाठी भाववाढ विषयक कलम निविदेत अंतर्भूत करावे. तथापि, कलम- ३८ व अतिरिक्त बाब दरसूचीकरिता (EIRL) भाववाढ लागू राहणार नाही.

क) ई-निविदा उघडण्यापूर्वी निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही-

१. ई-निविदा प्रणालीमध्ये विभागाच्या संकेतस्थळावरून कोणताही कंत्राटदार कोठूनही निविदा संच प्राप्त करुन घेऊन(download) शकेल व निविदा सादर करु शकेल. तथापि, निविदेची विधिग्राह्यता निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहील.

२. "निविदेसंबंधी आतापर्यंत पार पाडण्यात आलेली सर्व प्रक्रिया ही पारदर्शीपणे झालेली आहे आणि Bid Lock दिनांकापर्यत पूर्ण झालेल्या ई-निविदा प्रक्रियेसंदर्भात कोणतीही तक्रार नाही", असे प्रमाणपत्र निविदा भरणा-या संबंधित कंत्राटदारांकडून प्राप्त करुन घ्यावे. असे प्रमाणपत्र देण्यास उपस्थित कंत्राटदाराने नकार दिल्यास कारणांची विचारणा करावी व त्यांचे शंका निरसन करुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करावे. मात्र संबंधित कंत्राटदारांचा विरोध अनाठायी व नियमास अनुकुल नसेल तर तशी कारणे अभिलिखित करावीत. कार्यकारी/अधीक्षक अभियंत्यांनी संकेतस्थळामध्ये, निविदा प्रक्रियेत अन्य कुठल्याही व्यक्ती अथवा System Integrator/Service provider किंवा वेब साईट, कोऑर्डीनेटरने कोणताही हस्तक्षेप केलेला नाही व या सर्व प्रक्रियेत सर्व संबंधितांनी सर्वतोपरी योग्य काळजी (Due diligence) घेतलेली आहे, असे अभिलेखावर नमूद करावे व नंतरच निविदा भरणा-या जास्तीत जास्त कंत्राटदाराच्या उपस्थितीत निविदा उघडाव्यात.

ड) ई-निविदा उघडताना निविदा प्राधिका-याने करावयाची कार्यवाही-

१. कंत्राटदार उपस्थित नसताना निविदा उघडणे ही बाब सामान्यत: संशय निर्माण करणारी व पारदर्शकतेला छेद देणारी असल्याने बहुसंख्य कंत्राटदार उपस्थित राहात नसतील तर अशी निविदा उघडणे टाळावे.

२. लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर त्यातील सर्व कागदपत्रांची छानणी करुन पात्र / अप्रात्र कंत्राटदाराविषयीचे सर्व निष्कर्ष, पात्र /अपात्रतेची सर्व कारणे सर्व संबंधित कंत्राटदारांना कळवावीत व ही सर्व कारणे विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावीत. अशी कारणे प्रसिध्द करण्याची सोय जर निविदा पोर्टल /service provider च्या पोर्टलवर असेल तर तेथेही सर्व कारणे नमूद करावीत. विशेषत: ज्या कंत्राटदारांना अपात्र करण्यात आले आहे, अशा सर्व कंत्राटदारांना त्यांच्या अपात्रतेची कारणे त्यांना स्पष्टपणे कळविण्यात यावीत,अशा रितीने आतापर्यंतच्या निवड प्रक्रियेत संपूर्णपणे पारदर्शकता पाळण्यात आली आहे व निविदा प्रक्रिये विषयी कुणाचीही तक्रार नाही असे कार्यकारी अभियंता/ अधीक्षक अभियंता यांनी अभिलेखावर नमूद करुन शक्यतो सर्व /बहुसंख्य कंत्राटदाराच्या उपस्थितीत लिफाफा क्र.२ (निविदा दर विषयक लिफाफा) उघडण्यात यावा. कंत्राटदार उपस्थित नसतील तर कंत्राटदाराशी प्रत्यक्ष संपर्क साधून उपस्थित रहाण्यास सूचित करावे व शक्यतो त्यांच्या उपस्थितीत लिफाफा क्र.२ उघडण्यात यावा.

३. ई- निविदा विकत घेतलेल्या कंत्राटदाराचे (Prospective bidder) काही अभिवेदन त्याचेकडून लिखित स्वरुपात/ईमेल व्दारे प्राप्त करुन घ्यावे व अभिलेखावर जतन करावे. अभिवेदनातील मुद्याचे निराकरण किंवा कंत्राटदाराने उपस्थित केलेले मुद्दे , निविदेतील

करावयाचा आवश्यक बदल हा सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने ४ प्रत्यक्ष कामकाजांच्या दिवसाचे आत करण्यात यावा. सद्यस्थितीत दृकश्राव्य माध्यम, व्हिडीयो कॉन्फरन्सींग, ई-मेल अशी सर्व संवादाची वेगवान साधने उपलब्ध आहेत. यामुळे पत्रव्यवहारात वेळ वाया न घालवता या सर्व साधनांचा वापर करुन निविदाविषयी CSD (Comman Set of Deviations) तातडीने मंजूर करुन घ्यावे व दोन दिवसांच्या कालावधीत service provider च्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावेत. संबंधित कार्यकारी संचालक यांनी या प्रकरणी अनिवार्यता तपासून तत्संबंधीची कारणे अधोरेखित करुन जास्तीचा कालावधी मंजूर करावा. काही विवक्षित कारणांमुळे CSD(Comman Set of Deviations) विहीत मुदतीत upload करता येत नसतील तर लागणा-या जास्तीच्या कालावधीसाठी संबंधित कार्यकारी संचालकांची पूर्वपरवानगी अपवादात्मक परिस्थितीतच घेण्यात यावी. तद्नंतर लिफाफा क्र.१ उघडून कंत्राटदारांना बोलावून त्यांची निविदा प्राप्त होईपर्यंतच्या प्रक्रियेमध्ये कुठलीही तक्रार नाही असे प्रमाणपत्र निविदा भरणा-या सर्व कंत्राटदारांकडून प्राप्त करुन घ्यावे. लिफाफा क्र.१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी केल्यानंतर कंत्राटदारांच्या पात्र / अपात्रतेविषयीचे निष्कर्ष हे निविदा संकेतस्थळ तसेच विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. सर्व पात्र / अपात्र कंत्राटदारांना त्यांच्या पात्र /अपात्रतेबाबत अवगत करण्यात यावे व त्यानंतरच लिफाफा क्र.२ उघडावा.

४. **ई-निविदा प्रणाली अंतर्गत यापुर्वीच्या एकच निविदा प्राप्त झाली असल्याच्या संदर्भातील सर्व शासन आदेश /सूचना /निर्णय अधिक्रमित करुन खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत:**

४.१ एकच निविदा (Single Tender) म्हणजे निविदा सूचना प्रसिध्द केल्यानंतर फक्त एकच निविदा प्राप्त झाली आहे किंवा ब-याच निविदा प्राप्त होऊनही तांत्रिक लिफाफा क्र.१ तपासताना अन्य सर्व कंत्राटदार अपात्र ठरुन फक्त एकच कंत्राटदार पात्र ठरला आहे, अशा सर्व निविदा देकार एकच निविदा म्हणून समजण्यात येईल.

४.२ या सर्व एकच निविदा संदर्भात आदेशित करण्यात येते की, अशा प्राप्त झालेल्या निविदा लिफाफा क्र.२ न उघडता तात्काळ फेटाळण्यात याव्यात व लगेचच नवीन निविदा मागविण्यात यावी. मात्र या संदर्भात मूळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल करण्यात येऊ नये. मूळ प्रारुप निविदेमध्ये कुठलाही बदल न केल्यास नवीन केलेली मागणी ही व्दितीय मागणी समजण्यात येईल. अशा मागणीनंतर जर एकच निविदा प्राप्त झाली तर ती निविदा नाकारण्यात येऊन तृतीय निविदा मागविण्यात यावी. व्दितीय व तृतीय वेळेला मागविलेल्या निविदेत निविदापूर्व बैठक घेण्याची आवश्यकता नाही. अशा रितीने तृतीय वेळेला मागविलेली निविदा ही जर एकच निविदा प्राप्त झाली व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजित दराइतकी असेल तर ती स्वीकारण्यात यावी. प्रचलित दरसूचीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाल्यास याबाबत लगतच्या सक्षम वरिष्ठ स्तरावर पूर्ण समर्थनासह निविदा मंजुरीकरिता सादर करावी. जर या निविदा मान्य करण्यासारख्या नसतील तर त्या सक्षम स्तरावर रद्द करुन निविदा अटीची फेरतपासणी करावी व पुनर्निविदा प्रक्रिया राबवावी.

५. ई-निविदा प्रणाली अंतर्गत निविदा उघडणा-या अधिका-यांनी घ्यावयाची दक्षता व तद्नुषंगाने सूचनाः-

५.१ ई- निविदा प्रणाली अंतर्गत किमान ३ अथवा ३ पेक्षा जास्त निविदा देकार प्राप्त झाल्याचे आढळल्यास ई-निविदा प्राधिका-याने निश्चित केलेल्या वेळी लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा) उघडावा. तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांची छाननी करुन किमान १ किंवा २ कंत्राटदार प्राप्त ठरले तर अशा कामाचा लिफाफा क्र.२ न उघडता सदर निविदा फेटाळण्यात याव्यात व तात्काळ सदर कामाची फेरनिविदा प्रसिध्द करण्यात यावी. तांत्रिक लिफाफा छाननीसाठीचा कालावधी २ दिवस इतकाच मर्यादेत राहील. अशा कामाची फेरनिविदा प्रसिध्द झाल्यानंतर सदर मूळ निविदेच्या अनुषंगाने पात्र ठरलेल्या कंत्राटदारास निविदा प्रपत्र भरण्याची प्रक्रिया पुन्हा करावी लागेल. अशा रितीने जोपर्यत ३ कंत्राटदार पात्र ठरणार नाहीत तोपर्यंत प्रथम, व्दितीय व तृतीय निविदा मागणी करण्यात यावी. तृतीय निविदा मागणीच्या वेळी एकच कंत्राटदार पात्र ठरत असेल व ही निविदा कमी दराची अथवा अंदाजीत दराइतकी असेल तर ती स्विकारण्यात यावी.अन्यथा चुतर्थ निविदा मागणीची कार्यवाही करावी व यावेळी देखील एकच कंत्राटदार पात्र ठरत असल्यास निविदा स्वीकृत करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने याबाबत उचित निर्णय घ्यावा. चतुर्थ निविदा मागणीच्या वेळी आवश्यकतेनुसार पश्चात अर्हता विषयक निकष शिथिल करण्याचे अधिकार संबंधित मुख्य अभियंता यांना राहतील.

५.२ निविदांबाबत प्राप्त होणारे दर स्पर्धात्मक वाटत नसल्यास निविदा उघडणा-या अधिका-याने निम्नतम देकार सादर करणा-या कंत्राटदाराबरोबर वाटाघाटी करुन दर कमी करण्याचा प्रयत्न करावा. प्राप्त निविदा दर अंदाजपत्रकापेक्षा जास्त असल्यास व कंत्राटदार निविदेचे दर कमी करण्यास तयार नसल्यास ते फेटाळण्यात यावेत. तांत्रिक मंजुरी दिलेल्या अंदाजपत्रकाचे पुनर्विलोकन करुन सक्षम प्राधिका-याने आवश्यकता असल्यास दर विषयक बाबीत दुरुस्ती करुन फेरनिविदा मागविण्यात याव्यात. मंडळांतर्गत/ प्रदेशांतर्गत निविदा विषयीचा कल निविदा स्वीकृती करणा-या अधीक्षक अभियंता /मुख्य अभियंता यांनी अभिलेखीत करावेत. त्यापेक्षा जास्त दराचे निविदा प्राप्त होत असल्यास त्या स्वीकृत करण्यापूर्वी संबंधीत निम्नतम देकाराच्या कंत्राटदारासोबत वाटाघाटी करुन निविदा दर वरील मर्यादेत आणण्याचा प्रयत्न करावा.असे शक्य न झाल्यास व संबंधित कार्यकारी अभियंता /अधीक्षक अभियंता यांना प्राप्त झालेले दर योग्य वाटत असल्यास तसे त्यांचे अभिवेदन अभिलेखावर ठेवण्यात यावे व तद्नंतर सक्षम प्राधिका-यांनी अशा निविदा स्वीकृत कराव्यात.

६. निविदा मूल्यांकन व तांत्रिक लिफाफा क्र.१ ची छाननी -

निविदा उघडणा-या अधिका-यांनी व निविदा पडताळणी करताना घ्यावयाची दक्षता व तद्नुषंगाने सूचनाः-

६.१ या करिता स्वतंत्र मूल्याकंन समिती नियुक्त करण्याची आवश्यकता नसून निविदा स्वीकृत करण्यास सक्षम असलेल्या अधिका-यांनेच निविदांचे मूल्यांकन करावे. शासन स्तरावरील

निविदा स्वीकृतीच्या प्रकरणामध्ये संबंधित मुख्य अभियंत्यांनी निविदा मूल्यांकन अहवाल तयार करुन संबंधित महामंडळाच्या कार्यकारी संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

६.२ निविदा उघडण्याची सूचना सर्व कंत्राटदारांना द्यावी व त्याचे उपस्थितीच निविदा उघडाव्यात. जर काही कंत्राटदारांना निविदा उघडण्याचे दिवशी उपस्थित रहाणे शक्य नसेल तर त्यांच्याकडून त्याबाबत लेखी विंनती अभिलेखावर ठेवावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत बहुसंख्य कंत्राटदारांच्या उपस्थितीतच निविदा उघडाव्यात.

६.३ निविदा उघडल्यानंतर निविदेची छाननी करुन यासाठी निविदेच्या पात्रते /अपात्रतेविषयी काही शंका निर्माण झाल्यास, विशेषत: खालील बाबींवर कंत्राटदारांकडून स्पष्टीकरण मागविणे अनिवार्य राहील.

१) नोंदणी विषयक कागदपत्रे

२) पॉवर ऑफ ॲटर्नीबाबतची स्पष्टीकरणे

३) बँक प्रतीभूती हमी मधील त्रुटी

४) कंत्राटदाराने सादर केलेल्या तांत्रिक व आर्थिक विवरणात संदिग्धता व त्रुटी आढळत असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण

५) समान कामे, कामाचे गुणवता निकष, बांधकामातील कांमाचे /बाबीचे परिमाण व शुल्क.

६) आर्थिक ताळेबंद व विवरणातील त्रुटीबाबतचे स्पष्टीकरण

७) तांत्रिक लिफाफयातील सादर केलेले प्रस्ताव/ कागदपत्रातील अटी/शर्ती व पत्र व्यवहारातील संदिग्धता, अस्पष्टता इत्यादी.

याबाबत निविदा उघडणा-या सक्षम अधिका-यांनी (कार्यकारी अभियंता/ अधीक्षक अभियंता) संबंधित कंत्राटदारास पात्र /अपात्र ठरविण्यापुर्वी त्यांचेबरोबर लिखीत स्वरुपात/ई-मेल द्वारे पत्रव्यवहार करावा व कंत्राटदाराकडून लिखित स्वरुपात/ई-मेल द्वारे स्पष्टीकरण घेऊन ते पडताळावे. किरकोळ व महत्व नसलेल्या अटीमुळे कंत्राटदारास अपात्र करण्यात येऊ नये. अशा ठिकाणी कंत्राटदाराबद्दल लेखी / ई-मेल द्वारे स्पष्टीकरण घ्यावे व त्याची छाननी करुन कंत्राटदाराच्या निविदा पात्रता/अपात्रतेविषयी निर्णय घ्यावा. याबाबतचे सर्व अभिलेख धारिकेत व संकेत स्थळावर ठेवावेत निविदा स्वीकृतीसाठी सादर करण्याच्या प्रस्तावात या सर्व पडताळणी पध्दतीचा स्पष्ट उल्लेख करावा.

७. अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्क्यापेक्षा अधिक दराने कमी असलेल्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्वीकृती संदर्भात सुधारित मार्गदर्शक सूचनाः-

७.१ निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्क्यां- पेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबंधित कंत्राटदाराकडून एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजनबाबत सविस्तर तपशील निविदा बोलविणा-या अधिका-याने प्राप्त करुन घ्यावा. कंत्राटदाराने दिलेल्या तपशीलाच्या आधारे सदर काम निम्नतम देकाराच्या किंमतीत पूर्ण करता येणे शक्य असल्याची खात्री करुन घेण्यात यावी.

७.२ प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन काम किमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमंतीच्या १% एवढया किंमतीची बॅकेची प्रतिभूती हमी (Bank Guarantee) किंवा बँकेचा धनाकर्ष (डी. डी.) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निवेदेच्या लिफाफा

क्र.२ मध्ये सादर करावी. तसेच (Scan करुन ई-निविदेसोबत सादर करावी.) (उदा. १% ते १०% कमीदर - १% रक्कम).

७.३ प्राप्त निन्मतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने आहे तेवढया रकमेचा व वरील ७.२ प्रमाणे बँकेची प्रतिभूती हमी निविदेसोबत लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करावी. (उदा. १४% कमीदर - १०% पर्यंत करिता - १% व (१४% - १०%) -४% असे एकूण ५%). ही रक्कम रुपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रुपये १०००/- (एक हजार) ची बँकेची प्रतिभूती हमी सादर करणे अनिवार्य राहील.

७.४ बँक प्रतिभूती हमी ही ऐच्छीक असावी. तसेच सदर रक्कम ही उपरोक्त परिच्छेद ७.३ नुसार परिगणित केलेल्या रकमे इतकी असावी.

७.५ बँक प्रतिभूती हमी उपलब्ध करणे / बँकेची प्रतिभूती हमी परत करणे व इतर बाबींबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) बँक प्रतिभूती हमी निविदा बोलाविणाऱ्या कार्यकारी अभियंता यांच्या नावे असावी.

(ii) बँक प्रतिभूती हमी सरकारी /शेड्युल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकेची असावी.

(iii) बँक प्रतिभूती हमीची मुदत कामाच्या दोष दायित्व कालावधीनंतर (Defect Liability Period) एक महिना कालावधीपर्यंत वैध असावी.

(iv) बँक प्रतिभूती हमीची प्रत Scan करुन ई- निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी.

(v) बँक प्रतिभूती हमी सिलबंद लिफाफ्यामधून कंत्राटदारांनी निविदा स्वीकृतीच्या दिनांकात कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा. लिफाफ्यावर कामाचे नाव व निविदा सूचना क्रमांक लिहिण्यात यावा.

(vi) निविदा उघडल्यावर लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या बँक प्रतिभूती हमीचे लिफाफे कार्यकारी अभियंता यांनी निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत परत करावेत.

(vii) लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता घेवून ज्या कंत्राटदारांचे लिफाफा क्र.२ मधील देकार उघडण्यात येतील त्यामधील निम्नतम २ निविदाकारांचे बँकेची प्रतिभूती हमी लिफाफे वगळता इतर कंत्राटदारांचे बँकेची प्रतिभूती हमी लिफाफे ७ दिवसांत परत करण्यात यावेत.

(viii) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र.२ चे निम्नतम निविदाकाराची बँकेची प्रतिभूती हमी परत करण्यात यावी.

(ix) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे/ बँक प्रतिभूती हमी सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी.

७.६. कार्यकारी अभियंत्यांनी निम्नतम निविदाकरांकडून प्राप्त बँक प्रतिभूती हमीची मुदत दोष दायित्व कालावधी नंतर एक महिन्यापर्यंत वाढवून घेतल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्याची कार्यवाही करावी.

७.७. काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदींप्रमाणे ठेकेदारांकडून प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम व बँक प्रतिभूती हमी ३ महिन्याच्या आत कंत्राटदारांना कार्यकारी अभियंत्यानी परत करावी.

७.८ **ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याचा स्तर:-**

प्राप्त झालेल्या ई-निविदेचा प्रस्ताव सखोल छाननीअंती खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे मान्यतेस्तव सादर करण्यात यावा.

अ.क्र.	**कामाची किंमत**	**ई-निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करावयाचे स्तर**
१	रु. ३ लक्ष ते ५० लक्ष	कार्यकारी अभियंता
२	रु. ५० लक्ष ते २.५० कोटी	अधीक्षक अभियंता
३	रु. २.५० कोटी ते १५ कोटी	मुख्य अभियंता
४	रु. १५ कोटी व त्यावरील	शासनस्तरावर

इ) ई-निविदा स्वीकृती-

१. शासनाच्या ई-निविदा वेबसाईट, वेब पोर्टलवर प्रसिद्ध झाल्यानंतर निविदेतील अटी व शर्तीमध्ये अंशत:ही बदल करण्यात येवू नये. अशा बदलांमुळे कंत्राटदार आणि सर्वसामान्य जनता यांच्यामध्ये शासनाच्या कार्यपध्दतीबाबत संशय निर्माण होतो. तसेच शासनाच्या विश्वासार्हतेला तडा पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ई निविदेतील आशय अथवा तारखेत बदल करावयाचे झाल्यास ते सक्षम प्राधिकाऱ्याच्या लिखित पूर्व परवानगीनेच करण्यात यावेत. अशा मंजूरी प्रदान करताना सदरबाबतचे पत्र व त्याची कारणेही ठळकपणे संबंधित संकेतेस्थळ तसेच विभागाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिद्ध करण्यात यावे.

२. अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit)

कंत्राटदारांनी अंदाजपत्रकीय दराच्या १० टक्केपेक्षा कमी दर भरल्यास अतिरिक्त इसारा रक्कम/ कामगिरी सुरक्षा ठेव रकमेची बँक प्रतिभूती हमी निवेदेसोबत सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. निर्धारित रकमेपेक्षा कमी रकमेची बँक प्रतिभूती हमी सादर केल्यास अथवा आवश्यक बँक प्रतिभूती हमी सादर न केल्यास सदर कंत्राटदारांची निविदा रद्द करण्यात यावी.

३. **निविदेचा विधीग्राह्यता कालावधी - (Validity Period)**

कंत्राटदारांनी निविदेतील भरलेल्या दरासाठी विधिग्राह्यता कालावधी कार्यकारी अभियंता/ अधीक्षक अभियंता/मुख्य अभियंता/ शासन यांच्या स्तरावरील निविदांसाठी अनुक्रमे ६० दिवस, ७५ दिवस, ९० दिवस, व १२० दिवस असावा.

४. **ई-निविदा उघडण्याची प्रक्रिया कार्यालयीन वेळेत करणे:-**

ई-निविदा प्रक्रिया ही शासनाने मंजूर केलेल्या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रदर्शित करण्यात येते. सदर प्रक्रियामध्ये निविदा कार्यालयीन वेळेत न उघडणे, कंत्राटदाराचे अनुपस्थित उघडणे अशा तक्रारी होऊ नयेत म्हणून ज्या कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या आहेत अशा बहुसंख्य कंत्राटदारांसमोर निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात यावी व अशा निविदा कार्यालयीन वेळेत उघडण्यात याव्यात. काही अपवादात्मक परिस्थितीत सदरच्या निविदा कार्यालयीन वेळेत उघडणे शक्य नसल्यास संबंधित निविदा धारकास आगाऊ सूचना देऊन अशा निविदा कार्यालयीन वेळेनंतर उघडण्यात याव्यात. कार्यालयीन वेळेनंतर निविदा उघडण्याच्या प्रकियेमध्ये संबंधित निविदाधारकांची किंवा ३ स्वतंत्र व्यक्तिंची उपस्थिती अनिवार्य राहिल. यामुळे निविदा उघडण्याच्या प्रकियेमध्ये पारदर्शकता राहील.

५. **निविदा स्वीकृतीचे अधिकार-**

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने शासन निर्णय क्र.विअसु-२०१५/प्र.क्र.२१८/इमारती-२, दि.१६/१२/२०१५ अन्वये निर्गमित वित्तीय अधिकार लागू आहेत. त्यामध्ये खालीलप्रमाणे अधिक स्पष्टता आणण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता	रु. ५० लक्ष पर्यंत रकमेच्या निविदा (अंदाजपत्रकीय दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने)
अधीक्षक अभियंता	रु. ५० लक्ष पेक्षा जास्त ते २.५० कोटी पर्यंत रकमेच्या निविदा • अंदाजपत्रकीय दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने. • रु.५० लक्ष पर्यंत रकमेच्या निविदा प्रचलित दरसूचीने येणा-या अंदाजित किमंतीच्या तुलनेत ५% पर्यंत जादा दराने .
मुख्य अभियंता	रु.२.५० कोटी पेक्षा जास्त ते १५ कोटी पर्यंत रकमेच्या निविदा • अंदाजपत्रकीय दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने. • रु.२.५० कोटी पर्यंत रकमेच्या निविदा प्रचलित दरसूचीने येणा-या अंदाजित किंमतीच्या तुलनेत ५% पर्यंत जादा दराने

६. शासन स्तरावर निविदा स्वीकृती संदर्भात अनुसरण्याच्या मार्गदर्शक सूचनाः-

जलसंपदा विभागाच्या कामाची व्याप्ती पाहता जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. निविदा २०१७ / प्र. क्र.२७४ / मोप्र-२, दिनांक २७/०६/२०१७ व शुध्दीपत्रक निविदा १०१७/प्र. क्र.५०७ /१७ / मोप्र-१, दिनांक ०५/१२/२०१७ यामध्ये बदल करून खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत. व प्रस्तुत निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

अ) रू. १५ कोटी ते ३० कोटी पर्यंतच्या निविदा स्वीकृतीबाबत-

सदर निविदा स्वीकृतीसाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे :-

१.	प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
२.	सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
३.	सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
४.	मुख्य अभियंता(दवप्र) तथा सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्राल	सदस्य
५.	आंतरवित्तीय सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्राल	सदस्य
६.	संबंधित उप सचिव	सदस्य सचिव

i) निविदा स्वीकृतीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर संबंधित उप सचिव मंत्रालयात समितीची बैठक आयोजित करतील.

ii) समितीच्या बैठकीत सर्व सदस्य निविदा स्वीकृती प्रस्तावावर विचार विनिमय करून निर्णय घेतील.

iii) समितीच्या बैठकीसाठी तपासणीसूची सोबत जोडण्यात आली आहे.(**प्रपत्र-२**)

ब) रू. ३० कोटी पेक्षा जास्त किमतीच्या सर्व निविदा स्वीकृतीबाबत-

i) सदर निविदांची छाननी करण्याच्या दृष्टीने विभागांतर्गत खालीलप्रमाणे उप समिती स्थापन करण्यात येत आहे:-

१.	प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
२.	सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
३.	सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
४.	मुख्य अभियंता(दवप्र) तथा सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्राल	सदस्य
५.	आंतरवित्तीय सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्राल	सदस्य
६.	संबंधित उप सचिव	सदस्य सचिव

ii) निविदा स्वीकृतीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर संबंधित उप सचिव मंत्रालयात समितीची बैठक आयोजित करतील.

iii) समितीच्या बैठकीत सर्व सदस्य निविदा स्वीकृती प्रस्तावावर विचार विनिमय करतील.

iv) समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने अभिप्रायासह सदर निविदा स्वीकृती प्रस्ताव अप्पर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), प्रधान सचिव (जलसंपदा), अप्पर मुख्य सचिव (वित्त) व अप्पर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या समितीपुढे निर्णयास्तव ठेवण्यात येईल.

v) समितीच्या बैठकीसाठी तपासणीसूची सोबत जोडण्यात आली आहे.(**प्रपत्र-३)**

क) रु. १५ कोटी पेक्षा जास्त किमतीच्या निविदा स्वीकृतीचे सर्व प्रस्ताव संबंधीत मुख्य अभियंत्यानी सविस्तर मूल्यांकन अहवालासह संबंधित कार्यकारी संचालक यांचे मार्फत त्यांच्या स्पष्ट अभिप्रायांसह शासनास सादर करावेत.

७. देखभाल व दुरुस्तीच्या कामांच्या निविदा स्वीकृतीबाबत करावयाची कार्यवाही-

देखभाल, दुरुस्ती व सिंचन व्यवस्थापनाची कामे अत्यंत तातडीने व वेळेत पूर्ण करणे आवश्यक असते. खरीप व रब्बी हंगामापूर्वी परिक्षणाची कामे न झाल्यास शेतक-यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी देणे शक्य होत नाही. तसेच पाणी नाश देखील होण्याची शक्यता असते. त्यामुळे निविदा स्वीकृतीतील कालापव्यय टाळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

एकच निविदा प्राप्त झाली असेल व ती कमी अथवा निविदा किंमती एवढी असेल तर ती स्वीकृत करावी. एक किंवा दोन कंत्राटदार पात्र ठरले तरी सुध्दा निविदा उघडण्याबाबतची कार्यवाही करावी. एक किंवा दोन निविदा प्राप्त झाल्यास व त्या निविदा जास्त दराच्या असल्यास कंत्राटदारासोबत वाटाघाटी करुन दर कमी करुन घेण्याबाबतची कार्यवाही करावी. मंडळांतर्गत/ प्रदेशांतर्गत निविदा विषयीचा कल निविदा स्वीकृती करणा-या अधीक्षक अभियंता /मुख्य अभियंता यांनी अभिलेखीत करावा. त्यापेक्षा जास्त दराचे निविदा प्राप्त होत असल्यास त्या स्वीकृत करण्यापूर्वी संबंधीत निम्नतम देकार कंत्राटदारासोबत वाटाघाटी करुन निविदा दर वरील मर्यादेत आणण्याचा प्रयत्न करावा.

८. निविदा उघडल्यानंतर L-१ कंत्राटदाराने विहीत कालावधीत सुरक्षा अनामत रक्कम न भरल्यास त्याचेवर प्रचलित नियमानुसार कार्यवाही करुन L-२ कंत्राटदाराचा विचार करावा. तथापि, L-२ कंत्राटदाराचा विचार करताना L-१ कंत्राटदाराबरोबर वाटाघाटी करून अंतिम केलेल्या दराने व शर्तीनुसार L-२ कंत्राटदाराची निविदा स्वीकृत करण्याबाबत कार्यवाही करावी.

ई) सर्वसाधारण सूचना-

१. रु. १.५० कोटी पर्यंत रकमेच्या कामांकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार असणे बंधनकारक असल्याने सुशिक्षित बेरोजगार अभियंता तसेच मजूर सहकारी संस्थांना कामे देण्याबाबतच्या यापूर्वी असलेल्या प्रचलित कार्यप्रणालीत कोणताही बदल प्रस्तावित नसल्यामुळे प्रचलित कार्यप्रणालीची शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्यात यावी. शासन निर्णय क्र. सीएटी ०१/२०१५/प्र.क्र. २०/इमा-२, दिनांक २४/४/२०१५ मधील आदेशांचे पालन करण्यात यावे. (३३:३३:३४ % गुणोत्तर)

२. G.S.T. बाबत वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे/ परिपत्रकाचे अवलोकन करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंग्रजी परिपत्रक क्र.Sankiarn-२०१७/C.R.१२१(PART-II)/Building-२,दि.१९/९/२०१७ मधील GST मुद्याबाबतचे अवलोकन करुन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

३. संयुक्त अभियानाव्दारे स्थापित अभिकरणास (Joint Venture Consortium) निविदा प्रक्रियेत सहभागी करण्याच्या कार्यपध्दतीत काही निविदांमध्ये यापूर्वी अडचणी निर्माण होऊन लाचलुचपत प्रतिबंधक यंत्रणेने फौजदारी गुन्हे दाखल केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर पध्दत यापुढे रद्द करण्यात येत आहे.संयुक्त अभियान विषयक कोणत्याही अटी व शर्तीचा निविदा कागदपत्रांमध्ये समावेश करु नये.

४. **निविदेची प्रमाणित प्रत:-** निविदा स्वीकृत झाल्यानंतर स्वीकृत निविदेची मूळ प्रत विभागीय लेखापालाच्या ताब्यात असेल व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी विभागीय लेखापालाची राहील. निविदेच्या आवश्यक तेवढया प्रती काढून त्या विभागीय लेखापाल व कार्यकारी अभियंता यांनी संयुक्तपणे प्रमाणित कराव्यात अशा प्रमाणित प्रती कंत्राटदार व उपविभागीय कार्यालयास उपलब्ध करुन दयाव्यात. स्वीकृत निविदेच्या मूळ प्रतीमध्ये अनधिकृत खाडाखोड, दुरुस्त्या होऊ नयेत म्हणून उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

५. सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक १२/४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाची नियम सहावी आवृती १९८४ आणि यापूर्वी निविदा विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध निर्णय / परिपत्रके हे अधिक्रमित केली आहेत. तसेच या शासन निर्णयाव्दारे जलसंपदा विभागाने यापूर्वी निर्गमित केलेले वरील बाबतीतील संबंधित शासन निर्णय /परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत आहेत.

६ या शासन निर्णयातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता सर्व संबंधित कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांनी घ्यावी. अन्यथा संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यावर शिस्तभंग कारवाई करण्यात येईल.

७. या शासन निर्णयातील तरतुदी ह्या जलसंपदा विभागांतर्गत प्रकल्पाच्या बांधकामांचे निविदेस लागू राहतील. खरेदीसंबंधीच्या निविदांसाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने निर्गमित केलेले नियम व तरतुदी लागू राहतील. संगणक व संगणक प्रणालीच्या निविदांसाठी केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी.

८. सदर शासन निर्णय प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१८०५२२१५१५२२४२२७ आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेश व नावाने.

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2018.05.23 11:16:28 +05'30'

(सं.रा.तिरमनवार)
शासनाचे उप सचिव.

प्रत-

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा. मंत्री/ मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव
८) जलसंपदा विभाग/वित्त विभाग/नियोजन विभाग
९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१०) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/नागपूर
११) कार्यकारी संचालक, (सर्व)
१२) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी महासंचालनालय, मुंबई यांना प्रसिध्दीसाठी
१३) सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा विभाग
१४) सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा विभाग
१५) सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) कार्यासन मोप्र-१ (निवडनस्ती)

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/मोप्र-१ दिनांक :२२/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र

प्रपत्र-१

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय ,

पत्ता-------------------------

ई-मेल पत्ताः- दूरध्वनी क्र.

ई-निविदा सूचना क्र. **सन--------------**

कार्यकारी अभियंता , ... जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता .... नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ... यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नाव :-

निविदेची अंदाजित किंमत रुपये :-

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक------------------ ते दिनांक-------------------------

ई-निविदा उघडणे :- दिनांक---------------------------

खालील संकेतस्थळावर ई- निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http:// wrd.maharashtra.gov.in

२) http:// mahatenders.gov.in

(सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

३) कार्यकारी अभियंता,--- -------------- कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र.---

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

-- कार्यकारी अभियंता

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/मोप्र-१ दिनांक :२२/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र

प्रपत्र- २

रू १५ कोटी ते रू. ३० कोटी पर्यंत किमतीच्या सर्व निविदा स्वीकृतीबाबत

समितीच्या बैठकीसाठीची तपासणी सूची-

अ.क्र.	तपासणी करावयाची बाब	तपशील	शेरा
१.	**प्रशासकीय मान्यता** आदेश क्रमांक :- किंमत :- दरसूची वर्ष :-		
२.	**अर्थसंकल्पिय तपशील** बाब क्र. :- तरतूद :- **ब)प्रापणसूची मंजूरी तपशील(जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्र. निविदा-१२१३/प्र.क्र.(७३५/२०१३)/मोप्र-१,दिनांक०७/०९/२०१५ अन्वये विहीत केल्यानूसार** वर्ष:- बाब क्र. :- तरतूद :-		
३.	**तांत्रिक मंजूरी** आदेश क्रमांक :- किंमत :- दरसूची वर्ष :-		
४.	**प्रारूप निविदा मंजूरी तपशील** आदेश क्रमांक :- किंमत :-		
५.	निविदेचा प्रकार		
६.	**निविदा सूचना प्रसिद्धी** वर्तमानपत्रे व दिनांक :-		
७.	निविदा सूचना प्रसिद्धीचा कालावधी		
८.	निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक		
९.	निविदा पूर्व बैठकीचा दिनांक		
१०.	निविदा उघडण्याचा दिनांक		
११.	एकूण प्राप्त निविदा		
१२.	पात्र कंत्राटदार		
१३.	निम्नतम देकार व कंत्राटदाराचे नाव		
१४.	अंतिम देकार किंमत		
१५.	चालू दरसूचीप्रमाणे निविदेची अद्यावत किंमत		

१६.	निविदा ज्यादा/कमी दराची असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण		
१७.	अपात्र कंत्राटदारांची नावे व त्याची कारणे		
१८.	अपात्र कंत्राटदारांपैकी न्यायालयात दाद मागितल्यास त्याचा तपशील		
१९.	कमी दराची निविदा असल्यास शासन निर्णय क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.२/इमा.२, दि. १२/०२/२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही		
२०.	निविदेचा विधीग्राहय कालावधी		
२१.	पात्र कंत्राटदाराने केलेल्या कामांची यादी व कामाचे स्वरुप		
२२.	कंत्राटदाराच्या क्षमतेबाबत मुख्य अभियंता यांचे अभिप्राय		

मुख्य अभियंता यांची स्वाक्षरी

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/मोप्र-१ दिनांक :२२/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र

प्रपत्र-३

रू. ३० कोटी पेक्षा जास्त किमतीच्या सर्व निविदा स्वीकृतीबाबत समितीच्या बैठकीसाठीची तपासणी सूची-

अ.क्र.	तपासणीकरावयाचीबाब	शेरा
१	प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक, किंमत व दरसूची वर्ष	
२	तांत्रिक मान्यता आदेश क्रमांक, किंमत व दरसूची वर्ष	
३	प्रारुप निविदा आदेश क्रमांक व किंमत	
४	सदर कामाचा अर्थसंकल्पिय बाब क्र. व चालू वर्षाची तरतूद	
५	चालू दरसूचीप्रमाणे निविदेची अद्यावत किंमत व वर्ष	
६	निविदेचा प्रकार	
७	निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे	
८	निविदा प्रसिध्दीचा कालावधी	
९	निविदापूर्व परिषद दिनांक	
१०	निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक	
११	निविदा उघडण्याचा दिनांक	
१२	एकूण किती निविदा प्राप्त	
१३	निविदा उघडलेले पात्र कंत्राटदार	
१४	निम्नतम देकार सादर केलेल्या कंत्राटदाराचे नाव	
१५	कंत्राटदाराचा अंतिम देकार किंमत व निविदेच्या किंमतीवर टक्केवारी	
१६	निविदा उणे दराची असल्यास उणे दराच्या निविदेबाबत कंत्राटदाराने सादर केलेले स्पष्टीकरण	
१७	अपात्र कंत्राटदारांची नावे	
१८	अपात्र कंत्राटदारांची अपात्रतेची कारणे	
१९	अपात्र कंत्राटदारांपैकी कुणी दाद मागण्यासाठी न्यायालयात गेले आहे / होते का? असल्यास दाव्याची सद्य:स्थिती	
२०	पात्र कंत्राटदाराचाअंतिम देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १० टक्यांपेक्षा जास्त दराने कमी असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. बीडीजी २०१६/प्र.क्र.१३९/इमारती-२, दिनांक-१८ /०२ /२०१६ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही.	
२१	निविदेचा विधीग्राह्य कालावधी	
२२	पात्र कंत्राटदाराने यापूर्वी या स्वरुपाची कोणती कामे केली आहेत त्याची यादी	
२३	कंत्राटदाराच्या सक्षमतेबाबत मुख्य अभियंता यांचे अभिप्राय	

२४	निविदेमध्ये प्राप्त झालेल्या दरांची बाबनिहाय छाननी व त्या संबंधाने दर वाजवी व शासन हिताचे आहेत किंवा कसे याबाबत मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांचे भाष्य	
२४	निविदा डाऊनलोड करण्यापासून ते निविदा उघडण्याच्या कार्यवाहीबाबतचा संपूर्ण Active Log व त्याबाबत मुख्य अभियंता यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय	

मुख्य अभियंता यांची स्वाक्षरी

जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र. २४७/मोप्र-१ दिनांक :२२/०५/२०१८ सोबतचे प्रपत्र

प्रपत्र-४

महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,

पत्ता:-

....

ई-मेल पत्ता:- दूरध्वनी/फॅक्स क्रमांक :-

ई-निविदा सूचना क्र. सन........................

१) कामाचे नांव :-
२) निविदेची किंमत :-
३) निविदा प्राप्त झाल्याचा दिनांक :-
४) निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ :-
५) उपस्थित अधिकारी/कर्मचारी/कंत्राटदार यांचे नांवे व स्वाक्षरीचा तक्ता :-
निविदा लिफाफा क्र. १ उघडल्यानंतर निविदा प्रक्रियेसंबंधी कोणतीही तक्रार नसून लिफाफा क्र. २ उघडण्यास हरकत नसावी.

अ.क्र.	उपस्थितांची नांवे	पदनाम	दिनांकित स्वाक्षरी
१			
२			
३			
४			
५			
६			
७			
८			
९			
१०			